नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/06/2023 (गुरूवार) सकाळ

---

# सराईत गुन्हेगार राजेन्द्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर यांना MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द

## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत येणाऱ्या हुडको कॉलनी कळमेश्वर परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार **राजेंन्द्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर, वय २४ वर्ष, रा. हुडको कॉलनी, कळमेश्वर** हा मागील काही वर्षापासून हुडको कॉलनी, कळमेश्वर व परिसरात गुंडगिरी करुन तेथील नागरिकांना त्रास देत होता. तो नेहमी गुन्हेगारी कृत्यात गुंतलेला असायचा त्याने पोलीस स्टेशन कळमेश्वर परिसरात **चोरी, घरफोडी, जबरी चोरी, जबरी चोरी करून दुखापत करणे व स्वत:जवळ घातक शस्त्र बाळगणे** यासारखे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांना मारहाण करून तो आपली स्वत:ची भीती निर्माण करुन दहशत पसरवित होता. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचे विरूद्ध गुन्हे नोंद करून त्याला अटक करुन कारागृहात पाठविले आहे. परंतु **राजेंन्द्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर, वय २४ वर्ष, रा. हुडको कॉलनी, कळमेश्वर** हा कारागृहातुन बाहेर आल्यावर परत गंभीर स्वरूपाचे गुन्हे करत असायचा यांचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. त्यामुळे त्यांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्यांचेविरूद्ध प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु त्यांने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. त्यांचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. २७/०६/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी **राजेंन्द्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर, वय २४ वर्ष, रा. हुडको कॉलनी, कळमेश्वर** याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढला असुन त्यानुसार त्याला मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्द केले आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. बापु रोहम अति. कार्यभार काटोल विभाग यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ठाणेदार श्री. यशवंत सोलसे, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, निलेश बर्वे, विजय डोंगरे, ललीत यांनी पार पाडली.

# कुही ते मांढळ रोडवर अवैधरीत्या देशी दारुची
# वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर कार्यवाही
# पोलीस स्टेशन कुही यांची कार्यवाही

दिनांक २८/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ पो.स्टे. कुही हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम हे कुही ते मांढळ रोडवर देशी दारूची अवैध वाहतुक करणार आहेत. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून कुही ते मांढळ रोडवर स्मशान भुमीजवळ नाकाबंदी करून एक मोटार सायकल ही संशयितरीत्या कुही कड़े येत असतांना दिसली. त्यावर दोन इसम व काहीतरी संशयास्पद वस्तु दिसुन आल्याने त्या वाहनावर बसलेल्या इसमांवर पोलीसांना संशय आल्याने कुही पोलीसांनी त्या वाहन चालकास हाताचा इशारा करुन रोडचे बाजुला वाहन थांबविण्यास सांगीतले असता सदर वाहन चालकाने त्याचे वाहन हे रोडच्या बाजुला थांबविल्याने सदर वाहन चालक व त्याचे पाठीमागे बसलेल्या इसमास त्यांचे जवळ असलेल्या प्लास्टीक चुंगळी मध्ये असलेल्या वस्तु बाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यामध्ये देशी दारुचे निप असल्याचे सांगीतले यावरुन कुही पोलीसांनी पंचासमक्ष चालक व पाठीमागे बसलेला इसम यांना त्यांचे नाव गाव विचारले असता मोटार सायकल चालक याने त्याचे नाव **१) चेतन खुशाल सार्वे, वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं. १२ कुही जिल्हा नागपुर** असे सांगीतले तर त्याचे पाठीमागे प्लास्टीक जोरी घेवुन बसला असलेला इसम याने त्याचे नाव **२) हीमांशु प्रेमदास बोरकर, वय २० वर्ष रा. मालची ता. कुही जिल्हा नागपुर** असे सांगीतले व गाडीवर असलेल्या मुद्देमाला बाबत विचारपुस करुन त्यांना प्लास्टीक चुंगळी पंचासमक्ष उघडायला सांगीतले असता त्यांचेकडे १८० ML देशी दारु भिंगरी संत्रा नं. ०१ च्या २६४ प्लॅस्टीकच्या निपा प्रत्येकी किंमती १००/— रु. प्रमाणे एकुण २६४००/— रुपये व ९० ML देशी दारु भिंगरी संत्रा नं. ०१ च्या ५०० प्लॅस्टीकच्या निपा प्रत्येकी किंमती ५०/— रु. प्रमाणे एकुण २५०००/— रुपये आरोपीस देशी दारु बाळगण्याबाबत परवाना विचारला असता त्यांचे जवळ परवाना नसल्याचे सांगीतले. मोपेड ॲक्टीव्हा क्र. MH ४० AF ७२१८ याचेवर वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदरची मोपेड़ ॲक्टीव्हा किंमती अंदाजे ५००००/— रुपये असा एकूण १,०१,४००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम ६५ (ई), अ, ८३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, परि. सहायक पोलीस अधीक्षक श्री. अनिल मस्के (भा.पो.से.), पोलीस निरीक्षक श्री. महेश भोरटेकर, सहायक फौजदार क्रिष्णा घुटके, पोलीस नायक राजेंद्र मारबते, पोलीस अंमलदार पियुष वाडीकर, पोलीस स्टेशन कुही यांनी केली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर